सैनिकांच्या कुटुंबियांना संरक्षण
देण्याबद्दल जिल्हास्तरीय समिती
गठीत करण्याबद्दल...

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
शासन निर्णय क्र.एमआयएस १००६/प्र.क्र.३०९/वि.शा.४,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२. दि.०४ ऑक्टोबर, २००७.

पहा :- उप.सचिव, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे पत्र क्र.सासैक-२००६/
१०६४(प्र.क्र.१४७/०६)/२८, दिनांक ७.६.२००६.

प्रस्तावना : राज्यातील माजी सैनिकांच्या कल्याणार्थ उपाययोजना करण्याच्या संदर्भात महाराष्ट्र विधान परिषद नियम १८९ अन्वये मा.मंत्री, माजी सैनिकांचे कल्याण यांचे अध्यक्षतेखाली विधान परिषद सदस्यांची समिती नेमण्यात आली होती. सदर समितीने विधान परिषदेस दि.२० एप्रिल, २००६ रोजी सादर केलेल्या अंतरिम अहवालामधील शिफारस क्र.१ अनुसार सैनिकांच्या कुटुंबियांना संरक्षण देण्याबद्दल राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात एक समिती गठीत करण्याबाबत शिफारस केली आहे. त्या अनुषंगाने कार्यवाही करण्याची कार्यवाही शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय : प्रस्तावनेत नमूद केलेली पार्श्वभूमी लक्षात घेता या संदर्भात खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहेत :-

१. प्रत्येक जिल्ह्यामध्ये सैनिक/माजी सैनिकांच्या कुटुंबियांना संरक्षण देण्यासाठी एक जिल्हास्तरीय समिती गठीत करण्यात येत आहे. सदर समितीची रचना पुढीलप्रमाणे राहील:-

| | | |
|---|---|---|
| १) | जिल्हा पोलीस अधीक्षक | अध्यक्ष |
| २) | जिल्ह्याचा अतिरिक्त जिल्हाधिकारी | सदस्य |
| ३) | जिल्ह्याचा जिल्हा सैनिक अधिकारी | सदस्य |
| ४) | एक महिला पोलीस अधिकारी | सदस्य |
| ५) | जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यातील एक माजी सैनिक | सदस्य |

कृ.मा.प...

२. या समितीची दरमहा बैठक होईल. सदर समिती ही सैनिकांच्या कुटुंबियांना भेटून त्यांच्या तक्रारीबाबतचा आढावा घेईल. जिल्ह्यातील सैनिकांच्या कुटुंबावरील अन्याय / अत्याचारांच्या घटनांची माहिती सदर समितीकडून जिल्ह्याच्या मासिक पोलीस अहवालामध्ये नमूद करण्यात येईल.

३. जिल्ह्यातील सैनिकाच्या पत्नीने किंवा माजी सैनिकांच्या विधवा पत्नीने तिच्यावर अन्याय झाल्याची तक्रार पोलीस स्टेशनमध्ये केल्यास त्याची तात्काळ दखल घेवून प्रचलित कायद्यानुसार कार्यवाही करण्यात यावी.

४. जिल्हा सैनिक केंद्राचा अधिकारी हा जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्याला दरमहा भेट देवून सैनिकांच्या कुटुंबियांवरील अन्याय, अत्याचाराची माहिती घेईल, संबंधित पोलीस स्टेशनकडून याबाबत काय कारवाई करण्यात आली, याबाबत नियतकालिक अहवाल प्रधान सचिव, गृह विभाग, प्रधान सचिव, सामान्य प्रशासन विभाग (मा.सै.क.) व उपरोक्तप्रमाणे गठीत केलेल्या पोलीस अधिक्षकांच्या अध्यक्षतेखालील समितीकडे व सैनिक कल्याण विभागामार्फत सैनिक कल्याण मंडळाकडे पाठविले.

५. सदर शासन निर्णयाची अंमलबजावणी तात्काळ करण्यात यावी.

६. सदर शासननिर्णय सामान्य प्रशासन विभागाच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध असून त्याचा संगणक संकेतांक क्र. २००७१००४१५५७१६००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(प्र.बं. मयेकर)
शासनाचे कार्यासन अधिकारी.

प्रत,

पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
प्रधान सचिव, सामान्य प्रशासन विभाग (मा.सै.क.).
प्रधान सचिव (विशेष), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
सर्व जिल्हाधिकारी.
सर्व जिल्ह्यांचे पोलीस अधिक्षक.
सर्व जिल्हा सैनिक केंद्र अधिकारी.
सामान्य प्रशासन विभाग, कार्या.-२८.
संचालक, सैनिक कल्याण विभाग, पुणे.
निवड नस्ती - विशा-४.

*********

D:\Dhotre\2007\SPL-4\G.R02